# शासकीय तंत्रनिकेतन जालना

जालना-छत्रपती संभाजीनगर रोड, नागेवाडी,जालना जि.जालना

Ph No. ०२४८२ - २८२९२९, २८२३२३

E_Mail : principal.gpjalna@dtemaharashtra.gov.in

Web Addres s: www.gpjalna.ac.in


जा.क्र :- शातंजा/आस्था २/२०२६/ 1582

दिनांक : 03 JUL 2026

## मेस सेवा पुरविण्यासाठी निविदा सूचना

शासकीय तंत्रनिकेतन, जालना संस्था परिसरामधील मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना मेस सेवा पुरविण्या करीता केटरर्स यांचे कडून दोन लिफाफ्यात सीलबंद पदधतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १. | मुलांचे वसतिगृह प्रवेशक्षमता | १२० मुले (वसतिगुहाची दुरुस्तीचे कामे सुरू आहे त्यामुळे प्रवेशक्षमता कमी होण्याची शक्यता आहे) |
| २. | मुलींचे वसतिगृह प्रवेशक्षमता | ९६ मुली (वसतिगुहाची दुरुस्तीचे कामे सुरू आहे त्यामुळे प्रवेशक्षमता कमी होण्याची शक्यता आहे) |
| ३. | निविदा फॉर्मची किंमत | रु. १५००/- ना परतीची रक्कम |
| ४. | वयाणा रक्कम रुपये | रु. ६०,०००/- (साठ हजार रुपये मात्र) परतीची रक्कम |
| ५. | निविदा फॉर्मची किंमत अदा करणे | रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| ६. | बयाणा रक्कमेची डीडी काढणे | राष्ट्रीयकृत बँकेचा डीडी नावे प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना Payable at जालना |
| ७. | निविदा फॉर्म उपलब्ध होण्याचे स्थळ | श्री शेख आमीर शेख फारुख, वसतिगृह लिपीक, कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| ८. | निविदा उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक ०६/०७/२०२६ ते दिनांक १७/०७/२०२६ दु.३.००पर्यंत सुटीचे दिवस वगळून |
| ९ | निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख | दिनांक १७/०७/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सुटीचे दिवस वगळून. |
| ९. | सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांचा तपशिल निविदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती निविदेसोबतच सादर करण्यात यावे. | |
| १०. | निविदा उघडण्याची तारीख दि.२१/०७/२०२६ दुपारी ३.०० वा. | |

१. निविदा संस्थेच्या कार्यालयात आवक/जावक विभागात कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफ्यात जमा करावे.

२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांनी निविदा स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहे.

३. निविदेमध्ये भरलेले दर शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी करार केलेल्या दिनांकापासून ३१ में २०२७ पर्यंत लागू राहील व दर हे संपूर्ण कालावधीसाठी अंतिम राहतील.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, जालना.



Scanned with OKEN Scanner

## निविदेच्या अटी व शर्ती

१. मेस सेवा पुरविणेसाठी दोन लिफाफ्यात सीलबंद निविदा भरावयाची आहे.

२. निविदा फी रु. १५००/- रोखीने (ना परतीचे) रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांचेकडे भरण्यात यावे.

३. Earnest Money Deposit (EMD) बयाणा रक्कम रु. ६०,००० (साठ हजार मात्र) नॅशनलाइज बँकेचा डी.डी. PRINCIPAL, GOVERNMENT POLYTECHNIC, JALNA PAYABLE AT JALNA यांचे नावाने काढून ओरीजनल डी.डी. निविदेतील तांत्रिक लिफाफ्यात सादर करावे.

४. पात्र निविदाधारकाची बयाणा रक्कम ही अनामत रक्कम म्हणून कार्यालयात जमा केली जाईल.

५. निविदेसोबत तांत्रिक लिफाफ्यात फक्त कागदपत्रांची छायांकित प्रती सादर करावयाची आहे. Technical Bid तांत्रिक लिफाफ्यात मागणी केलेले ओरीजनल कागदपत्रे निविदा उघडण्याची दिवशी निविदाधारकाने सोबत ठेवावे ऐनवेळी ओरीजनल कागदपत्रे सादर न केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

६. Technical Bid व Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदाधारकांनी यासाठी शासकीय तंत्रनिकेतन, जालना येथील कार्यालयात उपस्थित राहावे.

७. अपूर्ण निविदा विचारात घेतली जाणार नाही.

८. निविदा फी व बयाणा रक्कम भरल्याशिवाय सादर केलेले निविदा ग्राह्य धरले जाणार नाही.

९. रकान्यात / प्रपत्र अ मध्ये सुचविलेले सर्व कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यात सादर करण्यात यावे.

१०. Technical Bid चे प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का असावा.

११. Commercial Bid/Financial Bid लिफाफ्यातील दरपत्रकातील दर विद्यार्थ्यांसाठी मेस चार्जेसचे मासिक दरामध्ये

अ) विद्यार्थी / विद्यार्थिनींचे दोन वेळेचे जेवण नास्टा वगळून नमूद करावे

ब) गेस्ट चार्ज एका वेळेसच्या जेवणासाठी गृहीत धरुन नमूद करावे. सदरील रक्कम वाणिज्यीक तुलनात्मक तक्ताकरीता ग्राहय धरण्यात येणार नाही.

क) प्राप्त निविदांपैकी तुलनात्मक तक्ता तयार करताना कमीत कमी दर असलेल्या निविदाधारकास कंत्राट देण्यात येईल. परंतु गुणवत्तेत कुठल्याही प्रकारची तडजोड केल्या जाणार नाही.

१२. दरपत्रकातील दर विद्यार्थ्यांना उत्तम गुणवत्तेचे जेवण मिळेल यादृष्टीने प्रचलित बाजारभावाचा विचार करून नमूद करावे. अत्यंत कमी अथवा जास्त दर असल्यास निविदा नाकारण्याचे अधिकार निविदा छाननी / पडताळणी समितीस असेल.

१३. मेस समिती व गुणवत्ता समिती मार्फत ठरविलेले अंदाजित अपेक्षित दर खालील प्रमाणे आहेत.

अ) विद्यार्थी / विद्यार्थिनींचे दोन वेळेचे जेवण नास्टावगळून रु. २५००/-

ब) आहार तज्ञांचे मत विचारात धरून मुलींसाठी दोन वेळेचे जेवणाचे दर मंजूर निविदादराच्या १० टक्के कमी असतील

क) गेस्ट चार्ज एका वेळेसच्या जेवणासाठी गृहीत धरुन रु.७०/-

१४. जेवणातील मेनु आठवडाभरात वेगवेगळा असावा याचा विचार करून दरपत्रकातील दर नमूद करावे. जेवणातील पदार्थाची आठवडाभराची संभावित यादी दरपत्रकासोबत जोडावी. यादीतील पदार्थ आठवडाभरात वेगवेगळा दिला जाईल असे प्रमाणपत्र सादर करावे.

१५. दरपत्राकातील दर नमुद करताना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून प्राप्त ॲकेडमीक कॅलेंडरनुसार मेससेवा पुरवावी लागेल. यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ च्या ॲकेडमीक कॅलेंडरचा नमुना निविदाधारकाने अभ्यासावा.

१६. भोजनगृहात लागणारे धान्य व तेल खालील दर्जाचे असणे बंधनकारक राहील. तसेच काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

गहू –एमपी वोट (सरवती) / पेशी / १४७ / लोकवन

तांदूळ – एचएमटी / कोलम

दाल - अनपॉलीशड

तेल – चांगल्या ब्रँडचे सनफ्लावर / सोयाबीन तेल (ऐगमार्क)

Scanned with OKEN Scanner

वरील धान्य व तेलाचा किमान १५ दिवसाचा साठा करून ठेवावा लागेल. खरेदी साठा केलेल्या धान्याचे बील जेवणाची गुणवत्ता तपासणी समितीकडे सादर करावी लागेल. **कोणत्याही परिस्थितीत तयार पीठ / मैदा वापरता येणार नाही. आढळून आल्यास करार संपुष्टात आणण्यात येईल.**

१७. जेवण तयार करण्यासाठी व विदयार्थ्यांना पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.

१८. कालबाहय मुदत संपलेले (Expiry date) कोणतेही साहीत्य / खादयपदार्थ वापर करता येणार नाही.

१९. निविदाधारकास मेस सेवा किंवा कटेरींग सेवा चालविण्याचा शासकीय कार्यालये / वसतीगृहे/ शैक्षणिक संस्था यांचा किमान २ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. (हॉटेल व इतर आस्थापनाचा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही )

२०. निविदेतील दरात साम्य असल्यास त्याबाबत अंतिम निर्णय प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना यांचा राहील.

२१. निविदाधारकाची कसलीही अट व शर्त मान्य करण्यात येणार नाही.

२२. ज्या निविदाधारकाने निविदा भरली आहे त्यानेच मेससेवा पुरवावी. इतरांना मेस चालविण्यासाठी देता येणार नाही. असे आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता कंत्राट संपुष्टात आणण्यात येईल.

२३. जेवणाव्यतिरिक्त इतर कुठलेही पदार्थ विक्रीस मनाई राहील.

२४. विद्यार्थ्यांकडून जेवणाच्या गुणवत्तेबाबत तीनपेक्षा जास्त तक्रारी प्राप्त झाल्यास कंत्राट संपुष्टात आणून निविदेतील एलएस-२ यास कंत्राट देण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांना राहील.

२५. मेस कंत्राटदारास विद्यार्थी / विद्यार्थीनी यांचे कडून मेस चार्जेस अग्रीम स्वरुपात घेता येणार नाही. तसेच मेस चा महीना पुर्ण झाल्यानंतरच १० दिवसाच्या मुदतीत पैसे विद्यार्थी / विद्यार्थीनी यांचे कडून वसूल करावे

२६. कुठल्याही कारणास्तव आपात्कालीन परीस्थितीत मेससेवा सुरु ठेवावी लागेल याची सर्वस्वी जबाबदारी मेस कंत्राटदाराची राहील.

२७. मेस कंत्राटदाराकडे स्वतः चे नावे व्यावसायीक गॅस कनेक्शन व पुरेसे इंधन असणे आवश्यक आहे.

२८. कुठल्याही कारणास्तव मध्येच मेससेवा बंद करता येणार नाही.

२९. मेस सेवा साठी असलेल्या सर्व कामगाराची सुरक्षा तसेच सर्व साहीत्य, भांडे, सामान याची सर्व जबाबदारी व सुरक्षा ही सर्वस्वी मेस कंत्राटदाराची राहील, यात संस्थेचा कसलाही संबंध असणार नाही.

३०. प्लास्टीक वस्तुं मध्ये गरम अन्न पदार्थ, खादय पदार्थ वाढण्यास सक्त मनाई राहील.

३१. मेसमध्ये शिस्तीचे वातावरण ठेवणे बंधनकारक राहील.

३२. निविदादर हे निविदेचे कार्यादेश दिलेल्या तारखेपासुन ३१ मे २०२७ पर्यंतच वैध राहील. जेवणाची गुणवत्ता व काम समाधानकारक आढळल्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना यांना राहील.

३३. निविदाधारकाची कसलीही अट व शर्त मान्य करण्यात येणार नाही.

३४. ज्या निविदाधारकाने निविदा भरली आहे त्यानेच मेससेवा पुरवावी. इतरांना मेस चालविण्यासाठी देता येणार नाही. असे आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता कंत्राट संपुष्टात आणण्यात येईल.

३५. जेवणाव्यतिरिक्त इतर कुठलेही पदार्थ विक्रीस मनाई राहील.

३६. विद्यार्थ्यांकडून जेवणाच्या गुणवत्तेबाबत तीनपेक्षा जास्त तक्रारी प्राप्त झाल्यास कंत्राट संपुष्टात आणून निविदेतील एलएस-२ यास कंत्राट देण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांना राहील.

३७. कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचे किवा रद्द करण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना याचेकडे राखुन ठेवले आहेत.

३८. सदरील निविदा बाबत कसलाही वाद उपस्थित झाल्यास याबाबत न्यायालयीन कार्यक्षेत्राकरीता जालना मुख्यालय राहील.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, जालना.

Scanned with OKEN Scanner

खालील तपशिलाप्रमाणे कागदपत्रांची छायांकित प्रत तांत्रिक लिफाफ्यात सीलबंद करून सादर करावेत.

प्रपत्र "अ"

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | जोडले असल्यास √मार्क करावे |
|---|---|---|
| ०१ | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ च्या अंतर्गत मेस / खानावळ नोंदणी असल्याचा दाखला/ प्रमाणपत्र किंवा उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र / नगरपरिषद यांचेकडील मेस /खानावळ / केटरींग चालविण्याचे प्रमाणपत्र | |
| ०२ | अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र. ३१ मे २०२७ पर्यंत वैध असावे | |
| ०३ | वस्तू व सेवा कर कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र (जीएसटी प्रमाणपत्र) | |
| ०४ | शासकीय संस्था /वसतिगुहे / कंपनी येथे मागील २ वर्षापासून सलग मेस / खानावळ / केटरिंग व्यवसाय करत असल्याचे किमान २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र (हॉटेल व इतर आस्थापनाचा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही) | |
| ०५ | ४० लाख किंवा ४० लाखा पेक्षा जास्त वार्षिक टर्न ओव्हर असल्याबावत सीए यांचे प्रमाणपत्र (मागील तीन वर्षाचे २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५, ) | |
| ०७ | निविदा फी १५०० रुपये भरल्याची पावती | |
| ०८ | वयाणा रकमेचा ओरीजनल डीडी रु. ६००००/- (साठ हजार रुपये) | |
| ०९ | बँकेकडील किमान रु. १० लक्ष रुपयाचे साल्व्हन्सी प्रमाणपत्र (दि.०१ एप्रिल २०२६ नंतरचे असावे ) | |
| १० | पॅन कार्डची सत्यप्रत | |
| ११ | आधार कार्डची सत्यप्रत | |
| १२ | सध्या मेस / खानावळ / केटरिंग व्यवसाय करत असलेल्या कामाविषयीचे कार्यदेशाच्या सत्यप्रती | |
| १३ | निविदाधारकाची माहिती | |

टीप - वरीलपैकी कोणतेही कागदपत्र लागू नसल्यास तसे प्रमाणपत्र निविदेतील तांत्रिक लिफाफ्यात जोडावे. तसेच अ.क्र. ०१ ते १३ या व्यतीरीक्त अनावश्यक कागदपत्रे जोडण्यात येवु नयेत.

Scanned with OKEN Scanner

# “ प्रपत्र - ब”

## निविदाधारकाची माहिती

१) निविदा धारकाचे / केटरींग एजन्सीचे नाव :-.................................................................

२) मालकाचे / भागीदाराचे नाव व संपूर्ण पत्ता :-

.................................................................................................

.............................................................................................................

३) दुरध्वनी क्रमांक:-...................................................................

- निवास:-...............मोबाईल नंबर:-.......... .....ईमेल :-........................
- उपहारगृह / व्यवसायाचे ठिकाण :-..................................
- संपर्कासाठी प्रतिनिधीचे नांव :-...................................मोबाईल नंबर :-.................

४) कॅटरिंगशी संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास / उच्चतम अर्हतेचा तपशिल द्यावा :-...................

.............................................................................................

५) अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक परवाना नोंदणी क्रमांक :-.............................................

६) व्यवसायकर / जीएसटी नोंदणी नंबर :-.........................

७) मनुष्यबळाची एकुण संख्या .................. स्त्री............... पुरुष..........

८) या व्यवसायासंबंधी प्रलंबीत खटला / शिक्षेबद्यलची माहिती :..................................

९) सदर प्रकारची सेवा या पुर्वी / सद्यपरिस्थितीत किती व कोणत्या प्रतिष्ठाणाकरीता देत आहे त्याचा तपशील :.........

.............................................................................................

१०) प्रति वर्ष व्यवसायाचा उलाढाल / टर्नओव्हर .........................................................

११) आयकर पॅन नंबर........................

१२) आधारकार्ड नंबर .............

१३) बँक खाते क्रमांक...................

१४) आयएफएससी कोड.......................

मी निवेदन करतो की, उपरोक्त संपूर्ण माहिती सत्य आहे. पुरविलेली माहिती खोटी आढळल्यास माझी निविदा रद्य होण्यास पात्र राहील.

निविदाधारकाची सही व शिक्का

Scanned with OKEN Scanner

# " प्रपत्र - क"

## घोषणापत्र

(काळया यादीत नसल्याबाबत)

मी / आम्ही मे ........................................................................ कंत्राटदार असे जाहीर करतो की, आमची संस्था मे........................................................................ ला महाराष्ट्र राज्य किंवा इतर कोणत्याही सरकारी संस्थेने निविदेत भाग घेण्यासाठी मागील पाच वर्षात काळया यादीत टाकलेली नाही. किंवा निविदा प्रकीयेत सहभाग घेण्यासाठी बंदी घातलेली नाही. तसेच संस्था / संस्था चालक यांच्या विरूध्द कोणत्याही खटला प्रलंबित नाही.

स्वाक्षरी ..............................................

नाव ..............................................

संस्थेचे नाव व पत्ता ..............................................

संस्थेचा शिक्का ..............................................

दिनांक ..............................................

Scanned with OKEN Scanner

# प्रमाणपत्र / हमीपत्र

मी .........................................आपणास हमी देतो की दरपत्रकातील दर निविदेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून नमूद केलेले आहे. जेवणाच्या तपशीलातील प्रत्येक पदार्थाचा दररोजच्या जेवणामध्ये समावेश असेल. जेवणातील भाजीचा मेनू आठवडाभरात वेगवेगळा राहील. **त्यामध्ये जास्तीत जास्त पालेभाज्या व फळभाज्या यांचा समावेश असेल. तसेच तयार पीठ / मैदा व कालवाहय खादयपदार्थ वापरणार नाही.** यामध्ये तफावत आढळल्यास निविदेच्या सेवाशर्तीनुसार कोणतीही पूर्वसूचना न देता कंत्राट संपुष्टात आणण्यात येईल याची मला जाणीव आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

Scanned with OKEN Scanner

# सेवेच्या अटी व शर्ती.

१ शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ या कालावधी करीता मुलांचे व मुलींचे / मुलींच्या वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थी / विद्यार्थीनींच्या सोयीकरीता जेवणासाठीचे मेससेवा पुरविण्यासाठी वैध राहील.

२ मुलांच्या वसतिगृहाची प्रवेशक्षमता १२० आहे व मुलींच्या वसतिगृहाची प्रवेशक्षमता ९६ आहे. तसेच कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

३ विद्यार्थी / विद्यार्थीनी यांचे कडून ठरविलेल्या निविदादराप्रमाणे दरमहा मेसचार्जेस मेस कंत्राटदारास स्वतः वसूल करावे लागेल. थकीत मेसचार्जेस बाबत संस्थेची कुठल्याही प्रकारची जबावदारी राहणार नाही.

४ मेस कंत्राटदारास विद्यार्थी / विद्यार्थीनी यांचे कडून मेस चार्जेस अग्रीम स्वरुपात घेता येणार नाही. तसेच मेस चा महीना पुर्ण झाल्यानंतरच १० दिवसाच्या मुदतीत पैसे विद्यार्थी / विद्यार्थीनी यांचे कडून वसूल करावे

५ मेस कंत्राटदारास विद्युत देयकापोटी सबमीटर मधील रीडींगप्रमाणे येणारी रक्कम वीजविल दरमहा ५ तारखेला स्वतः रोखपाल यांचेकडे महिना भरल्यानंतर न चुकता जमा करणे बंधनकारक राहील. तसेच विदयुत सब मीटर बंद पडल्यास किमान १००० रुपये वीज विल आकारण्यात येईल.

६ मेस कंत्राटदारास मेस जागेसाठीचे भाडे नाममात्र रुपये २०००/- दरमहा ५ तारखेला स्वतः रोखपाल यांचेकडे महिना भरल्यानंतर न चुकता जमा करणे बंधनकारक राहील.

७ मेस कंत्राटदारास मुलींच्या वसतिगृहात विद्यार्थीनींना महिला व्यक्तींकडून जेवण वाढण्याची व्यवस्था करावी लागेल व विद्यार्थी / विद्यार्थीनींना लागणारे अन्न वसतिगृह कुलमंत्री यांच्या निर्देशानुसार व्यवस्था करून शिजवावे लागेल.

८ मेस कंत्राटदाराकडे अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कार्यालयाचे एफ. डी. ए. चे सर्टीफीकेट नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

९ अन्न व औषध प्राधिकरणाकडून तपासणी झाल्यास त्यानुसार कार्यवाही करणे मेस कंत्राटदारास बंधनकारक राहील. कोणत्याही कायद्याचा किंवा नियमांचा भंग झाल्यास त्याची जबाबदारी मेस कंत्राटदाराची राहील. अन्न विषबाधा होणार नाही याची दक्षता घेणे मेस कंत्राटदारास बंधनकारक राहील. अन्नातून विषबाधा झाल्यास मेस कंत्राटदारास सर्वस्वी जवाबदार धरण्यात येईल.

१० जेवणासाठीचे फर्निचर, साहित्य / भांडी मेस कंत्राटदाराने स्वतः उपलब्ध करणे बंधनकारक आहे. तसेच त्याची सुरक्षितेची जवाबदारी मेसचालकाची राहील.

११ मेसपरिसरामध्ये स्वच्छता, शातंता व चांगली वर्तणूक ठेवणे ही सर्व जबाबदारी मेस कंत्राटदाराची राहील.

१२ भोजनगृहातील सर्व सेवकांची माहिती संस्थेला लेखी स्वरूपात द्यावी लागेल. तसेच कोणताही सेवक गेल्यास व नवीन सेवक नेमल्यास त्याची माहिती देणे मेस कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१३ भोजनगृहात बाल व वैद्यकीयदृष्ट्या अपात्र कामगार ठेवता येणार नाही. तसेच भोजनगृह व जवळचा परिसर स्वच्छ ठेवणे, कामगारांचे कपडे स्वच्छ ठेवणे मेस कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१४ मेस कंत्राटदारास भोजनगृहात काम करणाऱ्या सर्व कामगारांना स्वच्छता व सुरक्षेविषयी प्राशिक्षण देणे बंधनकारक राहील.

१५ मेसपरिसरात अग्निशमन यंत्र बसविणे व अद्ययावत ठेवणे याची सर्वस्वी जबाबदारी मेस कंत्राटदारावर राहील.

१६ मेसपरिसरात कोणताही अपघात होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक आहे. अपघात झाल्यास नुकसानभरपाई करण्याची सर्वस्वी जबाबदारी मेस कंत्राटदारावर राहील.

१७ भोजनगृहात पानबिडी, सिगारेट, तंबाखू, गुटखा, मादक पदार्थ ठेवण्यास मनाई राहील. तसेच मेस कंत्राटदार व त्याचे कर्मचारी ह्यांना वरील पदार्थाचे सेवन करण्यास मनाई राहील. भोजनगृहात कुठलेही बेशिस्त व अशोभनीय कृत्य होऊ न देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१८ मेस कंत्राटदारास मेसमध्ये स्वयंपाकासाठी लागणारे व विद्यार्थी / विद्यार्थीनींना जेवताना लागणारे पिण्याचे पाणी याची व्यवस्था स्वतः करावे लागेल.

१९ सत्रकालावधीच्या सुरुवात व शेवटच्या महिन्यात विद्यार्थी / विद्यार्थीनी जेवढे दिवस जेवण करतील तेवढेच दिवसाचे मेसभाडे विद्यार्थ्यांना आकारण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

२० सत्रकालावधीच्या मध्यात विद्यार्थी / विद्यार्थीनीचे खाडे असल्यास वसतिगृह कुलमंत्री यांच्या पूर्वपरवानगीने वसतिगृह सोडून गेलेली असल्यास त्या विद्यार्थी / विद्यार्थीनीचे संबंधित कालावधीचे खाडे याची नोंद ठेवावी व संबंधित कालावधीचे खाडे ग्राहय धरून मेसचार्जेस कमी करावे. ३० दिवसामागे प्रत्येकी ६ दिवस

२१ मेसमध्ये विद्यार्थी / विद्यार्थीनींना शुध्द शाकाहारी ताजे जेवण सकाळी ९.०० ते १०.३० व रात्री ७.०० ते ०९.३० असे दोन वेळेस पोटभर देण्यात यावे. गरज असल्यास कुलमंत्री यांच्या आदेशानुसार जेवणाच्या वेळेत बदल करावा लागेल.

२२ आठवडयाच्या प्रत्येक रविवारी दुपारी जेवणाच्या वेळी फिस्ट (गोड पदार्थ व फरसाण) देण्यात यावे व त्याच दिवशी नेहमीप्रमाणे संध्याकाळचे जेवण द्यावे. गोड पदार्थात दुग्धजन्य पदार्थ असू नयेत.

२३ जेवणाची गुणवत्ता संस्थेव्दारा गठीत समितीतर्फे वेळोवेळी तपासण्यात येईल तसेच समितीमार्फत वेळोवेळी सूचित केलेले निर्देशांप्रमाणे जेवणाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे मेस कंत्राटदारास बंधनकारक राहील. विद्यार्थ्यांकडून मेससंबंधी प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी ही समिती करेल.

२४ भोजनगृहाचा वापर कुठल्याही परिस्थितीत निवासाकरीता करता येणार नाही. तसेच कोणतीही व्यावसायिक उत्पादने व कंपनीची जाहिरात करण्यात सक्त मनाई राहील.

२५ भोजनगृहात कोणत्याही प्रकारचे प्राणी वा पक्षी पाळता येणार नाही.

२६ मेस कंत्राटदारास करार मुदतीपूर्वी भोजनगृह बंद करावयाचे असल्यास किमान ३० दिवसांची पूर्वसूचना लेखी द्यावी लागेल.

२७ स्वयंपाकासाठी लागणारा गॅस / इंधनाचा पर्याप्त इ. खर्च व व्यवस्था मेस कंत्राटदारास करावी लागेल.

२८ मेस कंत्राटदारास सत्र कालावधी संपेपर्यंत खानावळ चालू ठेवणे बंधनकारक राहील मध्येच सेवा सोडून गेल्यास नुकसान भरपाई स्वरूपात बयाणा रक्कम व बँक गॅरंटी जप्त करण्यात येईल.

२९ वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थी व संस्थेतील अधिकारी/ कर्मचारी यांच्याव्यतिरिक्त इतर कोणालाही मेसमध्ये जेवणासाठी प्रवेश देण्यात येऊ नये. विद्यार्थी / विद्यार्थिनींचे पालक असल्यास कुलमंत्र्याच्या परवानगीशिवाय प्रवेश देऊ नये.

३० मेसमध्ये शिस्तीचे वातावरण ठेवणे बंधनकारक राहील.

३१ भोजनगृहात लागणारे धान्य व तेल खालील दर्जाचे असणे बंधनकारक राहील.

गहू –एमपीबोट(सरबती) / पेशी / १४७ / लोकवन

तांदूळ – एचएमटी / कोलम

दाल - अनपॉलीशड

तेल – चांगल्या ब्रँडचे सनफ्लावर/सोयाबीन तेल (ऐगमार्क)

वरील धान्य व तेलाचा किमान १५ दिवसाचा साठा करून ठेवावा लागेल. खरेदी साठा केलेल्या धान्याचे बीले जेवणाची गुणवत्ता तपासणी समितीकडे सादर करावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत तयार पीठ वापरता येणार नाही.

३९. मेस कंत्राटदाराकडे स्वतः चे नावे व्यावसायीक गॅस कनेक्शन व पुरेसे इंधन असणे आवश्यक आहे.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, जालना.

Scanned with OKEN Scanner